आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ जुलै २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी घाना इथल्या संसदेत भाषण करणार

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर

- कर्जाचा आगाऊ भरणा करणाऱ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यावर रिझर्व्ह बँकेचे निर्बंध

**आणि**

- कर्करोगनिदान वाहन खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचा विरोधकांचा आरोप, आरोग्य विभागाच्या आयुक्तांकडून चौकशी सुरू असल्याची सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्र्यांची विधानसभेत माहिती

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी घाना, त्रिनिदाद टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामिबियाच्या दौऱ्यावर आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दुपारी घाना इथल्या संसदेत भाषण करणार असून अक्रा इथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधतील. अक्रा इथल्या एनक्रुमा स्मारकालाही ते भेट देणार आहेत. तत्पूर्वी आज त्यांनी घानाचे अध्यक्ष जॉन ड्रामानी महामा यांच्याशी चर्चा केली. या चर्चेत दोन्ही नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक, शेती, डिजिटल तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रात द्विपक्षीय भागीदारी वाढवण्याविषयी सहमती दर्शवली. यादरम्यान, संस्कृती, मानकं, आयुर्वेद आणि पारंपरिक औषधं या क्षेत्रांमधल्या चार सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

प्रधानमंत्री मोदी यांना घानाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार Companion of the Order of the Star of Ghana या पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. प्रधानमंत्री येत्या ६ आणि ७ तारखेला रिओ दी जिनेरो इथं होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहणार असून ब्राझीलचे अध्यक्ष लुईस इनासियो लुला दा सिल्वा यांच्याशीही ते चर्चा करणार आहेत.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज संध्याकाळी पुणे दौऱ्यावर येत आहेत. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या परिसरात पहिले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारुढ पुतळ्याचं अनावरण यासह त्यांचे विविध कार्यक्रम उद्या, शुक्रवारी नियोजित आहेत.

**<><><>**

लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी आज हरियाणाच्या मानेसार इथं पहिल्या राष्ट्रीय स्तरावरील शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अध्यक्षांच्या परिषदेचं उद्घघाटन केलं. या परिषदेला सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशाचे अध्यक्ष उपस्थित होते. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेचं उद्दिष्ट राष्ट्र निर्माण आणि संविधानिक लोकशाहीच्या बळकटीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका हे आहे. देशाच्या वाढत्या शहरीकरणात स्थानिक स्वराज्य संस्थांचं महत्त्वही या परिषदेच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात येणार आहे.

**<><><>**

अमरनाथ यात्रेला सुरूवात झाली असून दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातल्या पहलगाम आणि मध्य काश्मीरमधील गंदरबल जिल्ह्यातल्या बालताल या दोन्ही मार्गांवरून कडक सुरक्षेत यात्रेकरू रवाना झाले. २६८ वाहनांमधून यात्रेकरू रवाना झाले असून यापैकी १ हजार ९९३ यात्रेकरू बालटालला आणि ३ हजार २५३ यात्रेकरू पहलगामकडे रवाना झाले आहेत.

या यात्रेकरूंना दोन्ही मार्गांवरून पवित्र गुहेकडे जाण्याची परवानगी देण्यात आली असून ही गुहा हिमालयात १२ हजार ७५६ फूट उंचीवर आहे.

**<><><>**

भारत सरकारने पुन्हा एकदा पाकिस्तानी कलाकार आणि क्रिकेटपटूंच्या समाज माध्यमांवरील खात्यांवर बंदी घातली आहे. यापूर्वी मे महिन्यात भारतविरोधी प्रचार आणि प्रक्षोभक माहिती पसरवल्याबद्दल अनेक पाकिस्तानी यूट्यूब वाहिन्या आणि समाज माध्यमं खात्यांवर भारत सरकारने बंदी घातली होती. यात अभिनेत्री सबा कमर, अहद रझा मीर, दानिश तैमूर, क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदी आणि शोएब अख्तर सारख्या अनेकांची खाती आहेत. त्याशिवाय पाकिस्तानातून प्रसारित होणारे ओटीटी प्लॅटफॉर्मस, मिडिया स्ट्रीमिंग सेवा, वेबसीरिज, चित्रपट, पॉडकास्ट आणि गाण्यांवरही बंदी घातली आहे.

**<><><><>**

कर्जाचा आगाऊ भरणा करणाऱ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यावर रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादले आहेत. गैर व्यावसायिक कर्ज घेणाऱ्यांकडून अशा प्रकारचे शुल्क कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्थेने घेऊ नये असं रिझर्व्ह बँकेने म्हटलं आहे. येत्या आर्थिक वर्षापासून यासंदर्भातले दिशा निर्देश लागू होणार आहेत. सरकारी आणि खासगी बँका, सहकारी बँका, गैर बँकिंग वित्तीय संस्था यांना हे दिशानिर्देश लागू होतील. कर्जाचा पूर्ण किंवा अंशतः भरणा केला तरी तसंच कुठल्याही किमान कालावधीच्या अटीशिवाय हे दिशा निर्देश लागू होतील. ज्या कर्जांना हे दिशा निर्देश लागू होणार नाही, त्या कर्जाच्या मंजुरी पत्रात याचा स्पष्ट उल्लेख करण्याचे आणि शुल्काची रक्कम लिहिण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेने दिले आहेत.

**<><><><>**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या आज चौथ्या दिवशी सकाळी विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास झाला.

कर्करोग निदान वाहन खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे विजय वडेट्टीवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी केला. या आरोपांची आरोग्य विभागाच्या आयुक्तांकडून चौकशी केली जात असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिली. हे अधिवेशन संपण्याआधी या चौकशीचा अहवाल सभागृहात सादर करण्याची सूचना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली.

राज्यात विवाहपूर्व थॅलेसिमिया रोगाची चाचणी बंधनकारक करण्याची ग्वाही देखील त्यांनी विकास ठाकरे यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली. प्रत्येक जिल्ह्यात या रोगावरची उपचार केंद्र सुरू केली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

राज्यात सिटी स्कॅन आणि एम आर आय यंत्रांचा तुटवडा अथवा बंद असलेल्या सर्व ठिकाणी या सुविधा दोन महिन्यात कार्यान्वत करण्याचं आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी संजय पोतनीस यांनी विचारलेल्या प्रश्नावर दिलं. यासाठी चांगल्या कंपन्यांची यंत्रं खरेदी करण्याकरता आधीच दर निश्चिती करून परवानगी दिली जाईल असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहाला सांगितलं.

**<><><><>**

महाराष्ट्रात गेल्या तीन महिन्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे ७६७ कुटुंबं उद्ध्वस्त झाली असून, यानंतरही केंद्र सरकारला त्यांची पर्वा नाही, शेतकरी दररोज कर्जाच्या ओझ्याखाली दडपला जात असूनही सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे, अशी टीका लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या तीन महिन्यात राज्यात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती विधिमंडळाच्या चालू पावसाळी अधिवेशनात विधानसेभत दिली होती. त्यावरून राहूल गांधी यांनी ट्विटरवरून ही टीका केली आहे.

दरम्यान, राहुल गांधी यांनी त्यांच्या पक्षाच्या सत्ताकाळातल्या अपयशाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप भाजपानं या टीकेच्या प्रत्युत्तरात केला आहे. यासंदर्भात त्यांनी १९९९ चे २०१४ चा तपशील सामायिक केला असून, या काळात ५५ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, यासाठी जबाबदार कोण असा सवालही केला आहे.

<><><>

भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन तेंडुलकर करंडकाच्या दुसऱ्या कसोटी सामन्याचा दुसऱ्या दिवसाचा खेळ भारतीय वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता सुरु होणार आहे. काल पहिल्या दिवशी भारतानं प्रथम फलंदाजी करत दिवसअखेर ५ बाद ३१० धावा केल्या होत्या. कर्णधार शुभमन गिल ११४ तर रविंद्र जडेजा ४१ धावांवर खेळत आहेत. भारतातर्फे यशस्वी जयस्वालने सलामीला येऊन ८७ धावा केल्या.

<><><>

दहशतवादाच्या समस्येवर भारताच्या भूमिकेला पाठिंबा न दिल्याबद्दल परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर यांनी पाश्चिमात्य देशांना खडे बोल सुनावले आहेत. दहशतवादाबाबत अधिक एकीकृत जागतिक प्रतिसादाची गरज असल्याचं मत त्यांनी वॉशिंग्टनमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केलं. भारताबाहेर झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत आणि भारतात झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत भारताची एकच भूमिका एकच तत्वाला अनुसरुन असते असं ते म्हणाले. भारत आणि पाकिस्तानमधल्या शस्त्रसंधीबाबत ट्रम्प यांच्या विधानाबाबत बोलताना जयशंकर यांनी त्यावेळी जे घडले ते स्वयंस्पष्ट आहे, असं सांगून दोन्ही बाजूच्या लष्करानं शंस्त्रसंधीबाबत बोलणी केल्याचं त्यांनी म्हटलं.

**<><><><>**

विद्यार्थ्यांसाठीचे व्हीसा आता खुले झाले असून विद्यार्थ्यांनी त्यासाठी अर्ज करण्याचं आवाहन अमेरिकच्या गृह विभागाच्या उपप्रवक्त्यांनी केलं आहे. सर्व व्हीसा अर्ज देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने तपासले जाणार असून ते केवळ अमेरिकेत शिक्षण घेण्यासाठीच असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. विद्यार्थ्यां◌ंनी अमेरिकेत येऊन शिक्षण घ्यावं अशी आमची इच्छा असल्याचंही त्यांनी आज प्रसारमाध्यमांशी बोलतांना स्पष्ट केलं.

**<><><><>**

इंडोनेशियात बाली जवळच्या समुद्रात एका प्रवासी जहाजाला झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून इतर ३८ जण बेपत्ता झाले आहेत. या जहाजातून २३ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात यश आलं आहे. केएम टुनु प्रतामा नावाचे हे लाकडी जहाज केटापांग बंदरातून जावाच्या पूर्वेकडच्या बेन्यूवांगी कडे जात असताना हे जहाज बुडाले.

**<><><><>**

गाझा पट्टीत गेल्या काही वर्षांपासून सुरु असलेलं युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय मध्यस्थीच्या प्रस्तावावर तज्ज्ञांची मतं जाणून घेत असल्याचं हमासनं म्हटलं आहे. ही चर्चा गांभिर्यानं आणि जबाबदारीनं केली जात असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

युरोपातल्या बहुतांश देशांमध्ये अतिरिक्त उष्मा आणि अवर्षण यासारखे हवामानबदलाचे परिणाम दिसून येत आहेत. बऱ्याच ठिकाणी वाढत्या तापमानामुळे वणवे लागत आहेत परिणामी वनसंपदा आणि प्राण्यांचे जीव धोक्यात येत आहेत.

**//<><><><>//**